# वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती- सर्वसाधारण माहिती

-गोविंद लतिका अच्युतराव बोंदर
लेखाधिकारी,
जिल्हा परिषद उस्मानाबाद.

शासकीय कर्मचा-यांच्या वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीचे नियम महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम 1961 अन्वये व त्यानंतर त्यात केलेल्या सुधारणानुसार विहित केलेले आहेत.

1) सदर नियमान्वये –

रुग्ण म्हणजे

- ❖ शासकीय कर्मचारी किंवा त्याच्या कुटुंबातील कोणतीही व्यक्ती.
- ❖ रजेवर किंवा निलंबीत असलेले शासकीय कर्मचारी.
- ❖ पूर्ण वेळ शासकीय सेवेत कार्यरत असलेला कायम अथवा तात्पुरता शासकीय कर्मचारी. शासकीय कर्मचा-याची एक वर्षापेक्षा जास्त सेवा होणे आवश्यक आहे.

कुटुंब म्हणजे

- ✓ शासकीय कर्मचा-याची पती/पत्नी
- ✓ शासकीय कर्मचा-यावर अवलंबुन असलेली औरस मुले/सावत्र मुले/कायदेशीर दत्तक घेतलेली मुले
- ✓ शासकीय कर्मचा-यावर पूर्णपणे अवलंबून असलेले आई-वडील (निवृत्ती वेतन मुळ वेतनाच्या रुपये 9000/- सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय दि.02.08.2019) (महिला कर्मचा-याला तिच्या आई-वडीलांची किंवा सासु-सास-याची निवड करता येईल.)
- ✓ शासकीय कर्मचा-यावर पुर्णपणे अवलंबुन असलेला 18 वर्षाखालील भाऊ / अविवाहीत बहिणी व घटस्फोटीत बहिणी (वय लक्षात न घेता)

अपत्यांची संख्या

1. सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय दिनांक 20/11/2000 अन्वये (लागु दिनांक 01/05/2001) शासकीय कर्मचा-याला वैद्यकीय लाभासाठी दोन हयात अपत्याइतके आपले कुटुंब मर्यादीत ठेवणे आवश्यक आहे.

2. 01/05/2001 नंतर त्यांच्या कुटुंबातील अपत्यांची संख्या दोन पेक्षा जास्त झाल्यास आई-वडीलांना व सदर मुलाला वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती मिळण्याचा हक्क राहणार नाही.

3. मात्र पहिल्या दोन मुलांना वैद्यकीय सोयी मिळण्याचा हक्क राहील. तसेच, जर सदर कुटुंबाने त्यानंतर सक्षम प्राधिका-याकडुन निर्बिजीकरणाची शस्त्रक्रिया केल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यास आई वडिलांना

www.lekhamitra.blogspot.com

वैद्यकीय सवलती मिळण्याचा हक्क राहील. मात्र तिस-या किंवा त्यापेक्षा जास्त मुलांना अशा सवलती मिळणार नाहीत.

4. सदरचा नियम तीन हयात मुलांच्या बाबतीमध्ये 01/05/2001 पुर्वी लागू राहील.

शासन अधिसुचना क्र.एमआरव्ही-2000/प्र.क्र.(17/2000)/बारा, दि.28/03/2005 नुसार शासकीय सेवेत लागताना सध्या छोटे कुटुंब प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

## 2) मागणी

1) शासकीय कर्मचा-यांने वैद्यकीय देखभाल किंवा उपचार पूर्ण झाल्यापासून एक वर्षाच्या आत वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती देयकाची मागणी कार्यालयाकडे करणे आवश्यक आहे.

2) शासकीय कर्मचा-याचे वेतन व भत्ते ज्या लेखाशिर्षाखाली खर्ची घालण्यात येतात त्याच लेखाशिर्षाखाली वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीची देयके आहरित करावीत.

## 3) वैद्यकीय देयकाचे प्रकार

सर्वसाधारणपणे वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती देयकांचे चार प्रकार आहेत.

| अ.क्र. | रुग्णालयाचा प्रकार | उपचार घेतल्याचा प्रकार |
|---|---|---|
| 1. | शासकीय रुग्णालय | बाहय रुग्ण उपचार देयक |
| | | आंतर रुग्ण उपचार देयक |
| 2. | खाजगी रुग्णालय | शासनमान्य खाजगी रुग्णालय |
| | | इतर खाजगी रुग्णालय |
| 3. | वैद्यकीय अग्रिम | अग्रिम देयक |
| | | अग्रिम समायोजन देयक |
| 4. | विशिष्ट आजाराचे वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती | मधुमेह,डायलेसिस, इत्यादी |

## 4)देयकाचे नमुने –

वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती देयक सादर करताना खालील देयकांचे नमुने वापरले जातात.

| अ.क्र. | देयकांचा प्रकार | नमुना |
|---|---|---|
| 1. | नियमित देयक/अग्रिम समायोजन देयक | मकोनि नमुना क्र-24ए |
| 2. | अग्रिम देयक | मकोनि नमुना क्र-18ब |

वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीचे देयके ही कोषागारात सादर करताना ऑनलाईन पध्दतीने बीलपोर्टलच्या आधारे सादर करणे बंधनकारक आहे व जिल्हा परिषदेत नेहमीच्या पध्दतीने ऑफलाईन सादर केली जातात.

## 5) वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीचे देयक मंजूरीचे अधिकार –

Join telegram channel @lekhamitra

www.lekhamitra.blogspot.com

वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती तसेच वैद्यकीय अग्रिम देयके मंजूर करण्याबाबतचे अधिकार खालील प्रमाणे आहेत.(शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग दि.16/03/2016व दि.06/06/2019)

| अ.क्र. | रुग्णालय व उपचार प्रकार | प्राधिकृत अधिकारी | अधिकार मर्यादा |
|---|---|---|---|
| 1 | शासकीय रुग्णालय बाहय रुग्ण उपचार | कार्यालय प्रमुख | पुर्ण अधिकार |
| 2 | शासकीय रुग्णालय आंतर रुग्ण उपचार | कार्यालय प्रमुख | पुर्ण अधिकार |
| 3 | खाजगी रुग्णालय | प्रादेशिक विभाग प्रमुख | रु.2,00,000/-पर्यंत |
| 4 | खाजगी रुग्णालय | विभाग प्रमुख | रु.2,00,000/- ते रु.3,00,000/- पर्यंत |
| 5 | खाजगी रुग्णालय | प्रशासकीय विभाग | रु.3,00,000/- वरील |
| 6 | वैद्यकीय अग्रिम | विभाग प्रमुख | रु1,50,000/- |

6) 28 आकस्मिक व 5 गंभीर आजारांची यादी

शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.एमएजी 2005/9/प्र.क्र.1/आ.3, दि.19 मार्च 2005 चे सहपत्र परिशिष्ट अ नुसार शासन निर्दिष्ठ 27 आकस्मिक व 5 गंभीर आजाराची यादी.( शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग, दि.१७ डिसेंबर २०२० अन्वये कोव्हीड-१९ या आजाराचा समावेश करण्यात आला आहे. )

28 आकस्मिक आजारांची यादी

1.हृदयविकाराचा झटका, प्रमस्तिक संहनी, फुफ्फुसाच्या विकाराचा झटका,ॲवन्जिओग्राफी चाचणी.
2.अति रक्तदाब
3.धनुर्वात
4.घटसर्प
5.अपघात, आघात संरक्षण, हृदयाशी आणि रक्तवाहिनीशी संबंधी
6.गर्भपात
7.तीव्र उदर वेदना/आंत्र अवरोध
8.जोरदार रक्तस्त्राव
9.गॅस्ट्रो-एन्ट्रायटिस
१०.विषमज्वर
११निश्चेतनावस्था
१२.मनोविकृती सुरुवात
१३.डोळयातील दृष्टिपटल सरकणे
१४.स्त्रीरोगशास्त्र आणि प्रसुतीशास्त्र संबंधित यांच्याशी आकस्मिक आजार
१५.जननमुत्र आकस्मिक आजार

Join telegram channel @lekhamitra

१६.वायू कोथ
१७.कान नाक किंवा घसा यामध्ये विजातीय पदार्थ गेल्यामुळे निर्माण झालेले आकस्मिक आजार
१८.ज्यामध्ये तातडीने शस्त्रक्रिया करणे आवश्यक असते अशा जन्मजात असंगती
१९.ब्रेन टयुमर
२०.भाजणे
२१.इपिलेप्सी
२२.ॲक्यूट ग्लॅकोमा
२३.स्पायनस स्कॉड (मज्जारज्जू) संबंधीत आकस्मिक आजार
२४.उष्माघात
२५.रक्तासंबंधीत आजार
२६.प्राणी चावल्यामुळे होणारी विषबाधा
२७.रसायनामुळे होणारी विषबाधा.
२८. कोव्हीड-१९ (शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग, दि.१७ डिसेंबर २०२० अन्वये समावेश. )

5 गंभीर आजार
1.हृदय शस्त्रक्रियांची प्रकरणे
2.हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया
3. एंजिओप्लास्टी शस्त्रक्रिया
4. मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया
5. कर्करोग

7) वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती देयके तयार करताना वापरायचे नमुने –

| अ.क्र. | रुग्णालय व उपचार प्रकार | वापरायचा नमुना |
|---|---|---|
| 1 | शासकीय रुग्णालय बाहय रुग्ण उपचार | परिशिष्ट 1 नमुना अ |
| 2 | शासकीय रुग्णालय आंतर रुग्ण उपचार | परिशिष्ट 1 नमुना ब |
| 3 | खाजगी रुग्णालय | परिशिष्ट 1 नमुना क व ड |
| 4 | वैद्यकीय अग्रिम | कर्मचा-याचा अर्ज, कुटुंब प्रमाणपत्र, रुग्णालयाचे खर्चाचे अंदाजपत्रक व शस्त्रक्रियेची तारीख नमुद असल्याचे प्रमाणपत्र |

8) आवश्यक कागदपत्रे –

Join telegram channel @lekhamitra

www.lekhamitra.blogspot.com

वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीचे देयक मंजूरीसाठी सादर करताना शासकीय कर्मचा-याला रुग्णाने ज्या ठिकाणी उपचार घेतले आहेत त्या रुग्णालयाच्या प्रकारानुसार कागदपत्रे सादर करावी लागतात. वित्त विभाग शासन निर्णय क्र.वैखप्र 2012/प्र.क्र.347/प्रशा 2, दि. 06/09/2014 मध्ये विहीत केल्याप्रमाणे खालील कागदपत्रे वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती देयकासोबत जोडणे आवश्यक आहेत.

प्रपत्र –अ

वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबत तपासणी सुची

(वित्त विभाग शासन निर्णय क्र.वैखप्र-2012/प्र.क्र.347/प्रशासन-2/दि.6/9/2014 च्या अनुषंगाने)

| अ.क्र. | मुद्दा | मुद्याचे स्पष्टीकरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | मागणी कर्त्याचे नाव,पदनाम,कार्यालय | | |
| 2 | रुग्णाशी असलेले नाते | | |
| 3 | रुग्ण अवलंबुन असल्याचे प्रमाणपत्र<br>रुग्णाचे वय<br>ब. रुग्णाबाबतची वस्तुस्थिती(शिक्षण घेत आहे/सेवानिवृत्त)<br>क.अवलंबित्वाबाबत सेवापुस्तकात नोंद<br>ड.कोणत्या आधारावर अवलंबुन आहे याची तपशीलवार माहिती<br>ई. अवलंबुन असल्याचे कार्यालय प्रमुखांचे प्रमाणपत्र | | |
| 4 | मागणीकर्त्या अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन व वेतनश्रेणी | | |
| 5 | कुटुंब मर्यादित असल्याचे प्रमाणपत्र<br>अ.कुटुंब मर्यादित नसल्यास कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्याचे प्रमाणपत्र | | |
| 6 | पत्नी शासकीय/निमशासकीय/खाजगीसेवेत आहेत का | | |
| 7 | सासू/सासरे यांचे वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचे देयक असल्यास ते निवृत्तवेतन धारक आहेत का? तसेच त्यांचे सर्व मार्गानी मिळून एकत्रित उत्पन्न किती ? | | |
| 8 | पत्नी नोकरीस असल्यास संबंधीत कार्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र | | |
| 9 | अपघातप्रकरणी नुकसान भरपाईचा दावा दाखल केला आहे का न्यायालयात दावा प्रलंबित आहे का ?<br>ब. एमएलसी केला आहे का ?<br>क.गुन्हा नोंदविला आहे किंवा कसे ?(पत्राची छायांकित प्रत)<br>ड. घरगुती अपघात असल्यास नुकसान भरपाईचा दावा दाखल केला नसल्याचे कार्यालय प्रमुखांचे प्रमाणपत्र | | |
| 10 | वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचा दावा विहीत कालावधीत सादर केला आहे का | | |

www.lekhamitra.blogspot.com
Join telegram channel @lekhamitra

| | | | |
|---|---|---|---|
| | असल्यास संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र/समर्थन<br>ब. विहीत कालावधीत सादर केले नसल्यास त्याची कारणे<br>क. कारणे समर्थनीय असल्यास विलंबाबाबतची जबाबदारी<br>ड. कारणे समर्थनीय नसल्यास वजा करावयाची रक्कम | | |
| 11 | आंतररुग्ण म्हणुन उपचार घेतलेले रुग्णालय<br>अ.शासकीय/खाजगी/शासनमान्य खाजगी रुग्णालय<br>ब.उपचार राज्याबाहेर/राज्यांतर्गत घेतले आहेत का ?<br>क.उपचार देशाबाहेर घेतले आहे ?<br>ड.उपचारासाठीचे वैद्यकीय साहित्य देशाबाहेरुन मागविले आहे का ? | | |
| 12 | आंतररुग्ण कालावधी | | |
| 13 | रुग्णाचा आजार | | |
| 14 | शासननिर्दिष्ट आजाराच्या यादीतील क्र.(19 मार्च 2005 च्या शासन निर्णयनुसार) | | |
| 15 | जिल्हा शल्यचिकित्सकाचे प्रमाणपत्र | | |
| 16 | आकस्मिकता होती किंवा कसे याबाबतचे उपचार करणा-या डॉक्टरांचे प्रमाणपत्र | | |
| 17 | औषधाची यादी डॉक्टरांनी प्रमाणित केली आहे का ? | | |
| 18 | नमुना क व ड प्रमाणपत्र | | |
| 19 | औषधांमध्ये मद्यार्क/टॉनिक नसल्याबाबतचे प्रमाणपत्र | | |
| 20 | वैद्यकीय उपकरणे, सिरींज,सुया,डिस्पोजेबल,औषधे पुन्हा वापरात न आल्याबाबतचे प्रमाणपत्र | | |
| 21 | खाजगी विमा कंपनीकडे वैद्यकीय प्रतिपूर्तीचा दावा केला आहे का ? | | |
| 22 | आयकर परताव्याबाबतचे प्रमाणपत्र | | |
| 23 | विशेष बाब म्हणुन देण्याबाबतचा मुद्दा | | |
| 24 | वैद्यकीय अग्रिम घेतले आहे का | | |
| 25 | प्रत्यक्ष खर्चाची रक्कम रुपये | | |
| 26 | समायोजित करावयाची रक्कम | | |
| 27 | एकूण देय रक्कम रुपये | | |

कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी व शिक्का

जिल्हा शल्यचिकित्सकाचे प्रमाणपत्र :-

शासन निर्णय दि.30/07/1987 अन्वये कर्मचारी ज्या कार्यालयात काम करतो त्या जिल्हयातील जिल्हाशल्य चिकित्सक यांच्याकडुन आजार प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे. आजार प्रमाणित करताना ज्या ठिकाणी उपचार झाले आहेत त्या ठिकाणाचा आजार प्रमाणित करण्यासाठी संबंध येत नाही.

Join telegram channel @lekhamitra

www.lekhamitra.blogspot.com

प्रसुतीसाठी विहित मुदतीत शासकीय रुग्णालयात नावनोंदणी केल्याचे प्रमाणपत्र –

शासन निर्णय दि.23/8/1999 नुसार स्त्री कर्मचारी यांनी प्रसतीपूर्वी शासकीय/जिल्हा परिषद/महानगरपालिका/नगरपरिषदेच्या रुग्णालयात गर्भ धारणेनंतर पहिल्या दोन ते तीन महिन्यांत नाव नोंदविणे आवश्यक आहे. अन्यथा प्रसुतीसाठी खाजगी रुग्णालयात केलेल्या उपचारावरील खर्चास मान्यता मिळणार नाही.

कुटुंब मर्यादित असल्याचे प्रमाणपत्र –

सदरचे प्रमाणपत्र देताना प्रत्येक रकाना भरलेला असावा. जर पती किंवा पत्नी अशा आस्थापनेवर काम करीत असेल ज्या ठिकाणी त्यांना वैद्यकीय लाभ मंजूर होतात अशा वेळेस त्या आस्थापनेकडुन सदर वैद्यकीय लाभाची मागणी करण्यात आलेली नाही अशा आशयाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

महिला कर्मचारी प्रमाणपत्र –

आई वडील किंवा सासु-सासरे यांच्या निवडीचे प्रमाणपत्र तशी सेवापुस्तकात नोंद घेतल्याची छायांकित प्रत देयकासोबत जोडणे आवश्यक आहे.

## 9) देय रक्कम –

शासकीय कर्मचा-यांना वैद्यकीय खर्चाच्या देयकाच्या प्रत्यक्ष खर्चाच्या रक्कमापैकी देय नसलेल्या रकमा वजा करुन खालील प्रमाणे रक्कमा देय होतात.

| अ.क्र. | खर्चाचा तपशिल | शासकीय रुग्णालय | शासनमान्य खाजगी रुग्णालय | खाजगी रुग्णालय |
|---|---|---|---|---|
| 1. | रुग्णालयीन खर्च | 100% | 100% | 90% |
| 2. | वास्तव्याचा खर्च | 100% | खालील तक्त्याप्रमाणे | |
| 3. | बाहयरुग्ण खरेदी केलेली औषधे | 100% | 100% | 90% |
| 4. | बाहयरुग्ण केलेला इतर खर्च (विविध चाचण्या जसे क्ष-किरण, रक्त तपासणी इ.) | 100% | 100% | 90% |

## 10. वास्तव्याचा खर्च –

वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीच्या देयकामध्ये शासकीय कर्मचा-याला शासन निर्णय दि.19/03/2005 अन्वये रुग्णालयातील वास्तव्याचा खर्च खालील प्रमाणे अनुज्ञेय करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | खाजगी रुग्णालयातील वास्तव्याचा प्रकार | खर्चाची प्रतिपूर्ती करावयाचा दर |
|---|---|---|
| 1. | सर्वसामान्य कक्ष (जनरल वार्ड) | प्रत्यक्ष खर्चाच्या 95% |
| 2. | सर्वसामान्य कक्षाच्या बाजूचा बाथरुम नसलेला | प्रत्यक्ष खर्चाच्या 90% |

Join telegram channel @lekhamitra

| | | |
|---|---|---|
| | कक्ष | |
| 3. | बाथरुमसह स्वतंत्र कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या 75% |
| 4. | बाथरुमसह डबल बेडेड कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या 75% |
| 5. | बाथरुमसह वातानुकुलीत कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या 75% |
| 6. | अतिदक्षता कक्ष(आयसीयु) | 100% |

(विशेष टिप- वरील तक्त्या मधील अनुक्रमांक 5 येथे नमुद केलेला बाथरुमसह वातानुकुलित कक्ष हा केवळ जे अधिकारी विमानप्रवासासाठी पात्र आहेत त्यांना अनुज्ञेय राहील.)

## 11. खाजगी रुग्णालयातील खर्च प्रतिपूर्तीचे अधिकार विभाग प्रमुखांना खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वर्ष | अधिकार मर्यादा | शासन निर्णय | रकाना क्र.3 पेक्षा जास्त मर्यादेचे अधिकार |
|---|---|---|---|---|
| 1. | 1983 | रु.10,000/- | दि.14/01/1993 | सार्वजनिक आरोग्य विभाग |
| 2. | 1999 | रु.20,000/- | दि.29/07/1999 | सार्वजनिक आरोग्य विभाग |
| 3. | 2005 | रु.40,000/- | दि.19/03/2005 | प्रशासकीय विभाग |
| 4. | 2011 | रु.1,00,000/- | दि.16/11/2011 | प्रशासकीय विभाग |
| 5. | 2016 | रु.3,00,000/- | दि.16/03/2016 | प्रशासकीय विभाग |

## 12. वैद्यकीय अग्रिम –

शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग दि.10/02/2006 अन्वये सध्या

- हृदय शस्त्रक्रियेची प्रकरणे
- हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया
- एंजिओप्लास्टी शस्त्रक्रिया
- मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया
- कर्करोग

या पाच गंभीर आजारांकरीता रु.1,50,000/- इतके वैद्यकीय अग्रिम विभाग प्रमुखांना मंजुर करता येते.

वैद्यकीय अग्रिम मंजूर करताना खालील अटी व शर्ती आहेत.

- सदरचे अग्रिम हे फक्त 5 गंभीर आजारांकरीता शासकीय अथवा सदर आजारांकरीता शासनमान्य खाजगी रुग्णालयांकरीताच मंजूर करता येते.
- कर्मचारी जर अस्थायी असेल तर त्याने दोन स्थायी कर्मचा-याचे जामीन देणे आवश्यक आहे. तसेच सोबत कुटुंब प्रमाणपत्र जोडावे.
- अग्रिमासोबत रुग्णालयाचे शस्त्रक्रियेचा दिनांक व शस्त्रक्रियेकरीता संभाव्य खर्च दर्शविणारे पत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच अग्रिमाचा धनादेश संबधित रुग्णालयाच्या नावानेच देणे आवश्यक आहे.

Join telegram channel @lekhamitra

www.lekhamitra.blogspot.com

- सदरचे अग्रिम हे संबंधित कर्मचा-यास शस्त्रक्रियेपुर्वी जास्तीत 15 दिवस आधी देता येते.
- ज्या कारणासाठी अग्रीम मंजूर करण्यात आले आहे त्याच कारणासाठी त्याचा उपयोग झाला पाहिजे.
- अग्रिम मंजूर झाल्यापासून 6 महिन्यांत त्याचे समायोजन होणे आवश्यक आहे अन्यथा अग्रिमाची वसुली घरबांधणी अग्रिमासंबंधीच्या व्याजदराने करण्यात येईल.

### 13. वैद्यकीय अग्रिम मंजूरीचे अधिकार-

वैद्यकीय अग्रिम मंजूरीच्या अधिकारात खालीलप्रमाणे वाढ झालेली आहे.

| अ.क्र. | वर्ष | अधिकार मर्यादा | शासन निर्णय | गंभीर आजारांची संख्या |
|---|---|---|---|---|
| 1. | 1985 | रु.45,000/- | दि.21/8/1985 | चार |
| 2 | 1999 | रु.75,000/- | दि.21/8/1999 | पाच |
| 3 | 2000 | रु.1,00,000/- | दि.4/6/2000 | पाच |
| 4 | 2006 | रु.1,50,000/- | दि.10/2/2006 | पाच |

### 14. विशिष्ट आजारांचीखर्च प्रतिपूर्ती –

शासकीय कर्मचा-याला काही विशिष्ट आजारांच्या खर्चाची प्रतिपूर्ती खालील प्रमाणे देय ठरविण्यात आलेली आहे.

1) मधुमेह – रुग्णाला मधुमेह झाल्याबाबतचे सक्षम अधिका-याकडुन प्रमाणपत्र घ्यावे लागते. शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत पुढील औषधोपचारांसाठी प्रत्येक वेळेस नवीन प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नाही. मात्र शासकीय कर्मचा-यांच्या कुटुंबातील इतर व्यक्तींना प्रत्येक आजाराच्या वेळेस नवीन प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता राहील.

2) डायलेसिस – शासकीय कर्मचारी / अधिकारी व त्यांच्या कुटुंबियांनी मुत्रपिंड निकामी झाल्यानंतर, मुत्रपिंड प्रतिरोपन शस्त्रक्रियेपुर्वी व अयशस्वी शस्त्रक्रियेनंतर डायलिसीस करवुन घेतल्यास त्यावरील शासकीय अथवा खाजगी रुग्णालयातील वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय ठरविण्यात येत आहे.

वरील रकमेच्या प्रतिपूर्तीसाठी जिल्हा स्तरावर उपसंचालक आरोग्य सेवा यांच्या अध्यक्षतेखाली समिती डायलेसिस करण्याची आवश्यकता व डायलेसिसवर उद्भवलेला खर्च याची शहानिशा करुन प्रतिपूर्तीच्या रक्कमेची शिफारस करील मात्र सदरची रक्कम ही जसलोक रुग्णालय मुंबई येथे आकारल्या जाणा-या रक्कमेपेक्षा अधिक असणार नाही.

3अ. काही विशिष्ट आजाराकरीता शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या दरानेच रकमा देय होतात. उदा. शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग दि.28/9/2019 अन्वये खाजगी रुग्णालयात कर्करोगावरील उपचार घेतल्यास देय होणा-या रकमा निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

3ब. तर सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे पत्र दि.15/2/2016 अन्वये खाजगी रुग्णालयात हृदय रोगाबाबत घेतलेल्या उपचाराबाबत द्यावयाच्या रकमा निश्चित केलेल्या आहेत.

4. शासन मान्य खाजगी रुग्णालयात बाहय रुग्ण म्हणुन उपचार घेतल्यास सदर वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती देय होत नाही मात्र शासन निर्णय 31/1/2012 अन्वये शासकीय कर्मचारी / अधिकारी व त्यांचे कुटुंबिय यांच्यावर शासनमान्य रुग्णालयात हृदय विकाराशी संबंधित गंभीर आजारावर (हृदय शस्त्रक्रिया-Heart Surgery, हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया – Bypass surgery व एंजियोप्लास्टी शस्त्रक्रिया) शस्त्रक्रिया केल्यानंतर त्या

www.lekhamitra.blogspot.com

बाहय रुग्ण (Follow up)उपचारावरील (वैद्यकीय सल्ला शुल्क, औषधे व तपासण्या) खर्चाची प्रतिपूर्ती रु.15,000/- मर्यादेपर्यंत अनुज्ञेय ठरविण्यात आले आहे.

15. वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीचे देयक सादर करताना खालील बाबी प्रामुख्याने लक्षात ठेवणे आवश्यक आहे
1. परिशिष्ठ 1 पुर्ण भरावे.
2. नमुना क व ड वरील सर्व रकाने व्यवस्थित भरुन दोन्ही मधील रकमा जुळणे आवश्यक आहे.
3. नमुना ड वर रुग्णालयाचा नोंदणी क्रमांक न चुकता नमुद करावा.
4. औषधांची प्रमाणके संबंधित वैद्यकीय अधिका-याकडुन प्रमाणित करुन घ्यावीत.
5. देयकासोबत सर्व चाचणी अहवाल जोडावेत.
6. ज्या कालावधीत रुग्ण आंतररुग्ण म्हणुन रुग्णालयात दाखल असले, त्याच कालावधीतील औषधे/चाचण्या/उपकरणे यांच्या रकमा देयकात घेण्यात याव्यात.
7. एका वर्षापेक्षा जास्त कालावधीनंतर देयक सादर केल्यास कर्मचा-याने देयक कार्यालयास सादर केल्यानंतर देयकाच्या झालेल्या प्रवासाबद्दल प्रत्येक टप्पेनिहाय नमुद करावे.
8. ज्या लेखाशिर्षाखाली देयक खर्ची टाकावयाचे आहे, त्याचा संपूर्ण तपशिल प्रस्तावात न चुकता नमूद करावा.
9. काही कर्मचा-यांकडुन ब-याचवेळा जोडुन असलेल्या कालावधीचे देयक सादर करताना एका दिवसाचा वास्तव्याचा खर्च दोन्ही देयकात आकारला जातो, तो एकाच देयकात नमुद करावा.
10. जर एखादया कर्मचा-यास दि.1/5/2001 पुर्वीची तीन पेक्षा जास्त मुले असतील तर सोबत निर्बिजीकरणाची शस्त्रक्रिया केल्याचे प्रमाणपत्र जोडण्याची आवश्यकता आहे.
11. जर खाजगी रुग्णालयात इंन्ट्रा ऑक्युलर लेन्स बसवली असल्यास त्याची किंमत शासकीय रुग्णालया इतकी सिमित करण्यात यावी.

## सर्वसाधारण सुचना

- वैद्यकीय देयकाच्या संचिकेतील कागदपत्रांना पृष्ठ क्रमांक देण्यात यावेत.
- तपासणी सुचीमध्ये कागदपत्रांचा पृष्ठ क्रमांक तपासणी सुचीमधील संबंधीत मुद्यांच्या समोरील रकान्यात नमुद करावा. असे पृष्ठ क्रमांक नमुद न केल्याने लेखापरिक्षणास विनाकारण उशीर होऊ शकतो.
- तपासणी सुचीतील लागु असणाऱ्या व लागु नसणाऱ्या प्रत्येक मुद्यांचे स्पष्टीकरण त्या मुद्यांसमोर अथवा स्वतंत्रपणे नमुद करावे.
- वैद्यकीय देयकातील आंतररुग्णकालावधीव्यतिरिक्त पावत्या प्रस्तावासोबत सादर करुन नयेत.
- मुळ डिस्चार्ज कार्ड संचिकेत सामील करावे.

- प्राधिकारासह सुचना

Join telegram channel @lekhamitra

www.lekhamitra.blogspot.com

१) एकाच कर्मचाऱ्याची दोन वेगवेगळया कालावधीची वैद्यकीय देयके एकत्र करुन सादर करु नयेत. आंतररुग्ण कालावधी हा जर वेगवेगळा असेल तर त्या प्रकरणांची पुढील आंतररुग्ण प्रकरणांशी सांगड घालण्यात येऊ नये. ते प्रकरण स्वतंत्रपणे हाताळण्यात यावे. (शासन परिपत्रक ग्राम विकास व जलसंधारण विभाग दि.०१ जुलै १९९७)

२) सार्वजनिक आरोग्य विभागाचे पत्र दि.१५.०२.२०१६ नुसार खाजगी रुग्णालयात हृदयरोगाबाबत एन्जिओप्लास्टी तसेच बायपास सर्जरीबाबत घेतलेल्या उपचाराबाबत खर्चाची परिगणना करण्यात यावी.

३) रजिस्ट्रेशन चार्जेस ही बाब वैद्यकीय प्रतिपुर्तीस अनुज्ञेय नाही. (ग्रामविकास व जलसंधारण विभाग ज्ञापन दि.२२ मे २०१९)

४) शासनपत्र दि.१९.१०.२०१५ नुसार (फेसमास्क, ग्लोव्हज,कॉटनरोल, युरोमीटर इ.) नादेय रक्कमा वगळण्यात येऊन त्याप्रमाणे देयकाची गणना करावी.

५) देयकामध्ये पुढील बाबींच्या वजाती कराव्यात. (ग्रामविकास व जलसंधारण विभाग पत्र दि.२२ मे २०१९)

| | |
|---|---|
| Oxygen Mask | Microscope cover |
| All Types of Gloves | Scrub |
| Plain Sheet | Face mask |
| Handrub | Dispo cap Surgical Blade |
| Under pad | Fresubin Powder |
| Catheter mount | Urometer |
| Green tub filter | Surgical blade |
| ECG Leads | HME filter |
| Caccu suck suction set | Dynaplast |
| Manometer | Silicon catheter |
| Hexidine hand wash | Kabripro Powder |
| Diaper | |

६) जिल्हा शल्यचिकीत्सकांचे प्रमाणपत्रात आजाराचे नाव, आजाराचा क्रमांक व सदर आजार ५ गंभीर आजारापैकी आहे की २८ आकस्मिक आजारांपैकी आहे याचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

www.lekhamitra.blogspot.com

Join telegram channel @lekhamitra

७) आंतररुग्ण काळातील औषधोपचाराच्या पुष्ठयर्थ आवश्यक ती बीले, प्रमाणके व प्रमाणपत्रे इ. सादर करावीत. {म.रा.से.वै.देखभाल नियम १९६१ मधील नियम ११ (२)} झेरॉक्स प्रती जोडु नयेत.

८) वैद्यकीय प्रतिपुर्तीच्या सर्व मागण्या कर्मचाऱ्याने संबंधीत नियंत्रकप्राधिकाऱ्याकडे एका वर्षाच्या आत सादर करणे (उपचार पुर्ण झाल्यापासुन) बंधनकारक आहे. {नियम १९६१ मधीलनियम ११ (१)}
प्रतिपुर्ती मिळविण्याबाबतचा दावा विहीत कालावधीत केला किंवा कसे याबाबत संबंधीत नियंत्रक अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र व कर्मचाऱ्याच्या अर्जाची दिनांकीत प्रत संलग्न करावी .

९) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय दि.२१ ऑगस्ट १९९९ नुसार स्त्री कर्मचारी/ अधिकारी अथवा कर्मचाऱ्यांची पत्नी यांनी प्रसुतीपुर्वी शासकीय /जिल्हापरिषद वा महानगरपालीका / नगरपरिषदच्या रुग्णालयात गर्भधारणेनंतर पहिल्या २-३ महिन्यात नावनोंदणी करणे आवश्यक आहे. प्रसुतीपुर्वी नोंदणी केलेली नसल्यास पुर्ण कालावधीच्या प्रसुतीसाठी खाजगीरुग्णालयात घेतलेल्या उपचारावरील खर्चास मान्यता मिळणार नाही.

१०) अग्रीम मंजुर करण्यापुर्वी प्रस्तावाची सखोल छाननी करण्याची जबाबदारी संबंधीत कर्मचाऱ्यांच्या नियंत्रक अधिकाऱ्याची राहील. (सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय दि.०४ जुलै २०००)

११) ज्या शासकीय तसेच खाजगी रुग्णालयास शासनमान्यता देण्यात आलेली आहे त्या रुग्णालयात उपचार करुन घेत असल्यास वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी जिल्हा वैद्यकीय अधिक्षक /जिल्हाशल्यचिकीत्सक यांचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील. (शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे पत्र दि.२४.०२.२०१६)

१२) ज्या कारणासाठी हे अग्रीम मंजुर झाले आहे त्याच कारणासाठी ते उपयोगात आणले आहे हे पाहण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखाची राहील. (सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय २१.०८.१९८५ मधील क्रमांक ५)

१३ )जर अग्रीमाची संपुर्णरक्कम वैद्यकीय प्रतिपर्तीच्या देयकामधुन वसुल होण्यासारखी नसेल तर उरलेली रक्कम शासकिय कर्मचाऱ्याच्या वेतनातुन एकाच हप्त्यातुन वसुल करण्यात यईल. ( सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय २१.०८.१९८५ मधील क्रमांक ६-ब)

१४) अग्रीम मंजुर झाल्याच्या दिनांकापासुन सहा महिन्याच्या कालावधीत वसुल झाले नाही तर घरबांधणी अग्रीमासाठी देय आसलेल्या व्याजाच्या कमीत कमी दराने व्याज अकारण्यात यावे. ( सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय २१.०८.१९८५ मधील क्रमांक ७)

१५) ग्रामविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र दिनांक २९ मे १९८९ मधील अट क्रमांक १ नुसार अन्नपदार्थ (FOODS), टॉनिक्स(TONICS), जंतुनाशके (DISINFECTANTS) हे प्रतिपुर्तीस पात्र नाहीत.

Join telegram channel @lekhamitra
www.lekhamitra.blogspot.com

१६) शासन पत्र क्रमांक एम.ए.जी.-१०५१/४९०७/आ-०९ . दि.०२ जानेवारी १९८५ अन्वये देयक सादर करण्यासाठी जी मार्गदर्शक तत्वे दिली आहेत त्याप्रमाणे तपासुन तसेच आवश्यक दाखले, प्रमाणपत्रे जोडली आहेत किंवा नाहीत हे तपासुन देयक परिपुर्णरित्या स्विकारणे नियंत्रक अधिका-याचे कर्तव्य आहे. जो पर्यंत आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता होऊन देयक प्राप्त होत नाही तोपर्यंत चा कालावधी हा संबंधित कर्मचाऱ्यातर्फे झालेला विलंब कालावधी समजावा.(सार्वजनिक आरोग्य विभाग परिपत्रक दिनांक ०७ जुन १९९१)

१७) शासकिय कर्मचा-याने प्राधिकृत वैद्यकिय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र मधुमेह आजार प्राथमिक अवस्थेत असतानाच घ्यावे. त्यानंतर पुढील औषधोपचारासाठी त्याच प्रमाणपत्राचा वापर करावा.दरवर्षी नविन प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नाही.तथापि, कुटुंबातील इतर व्यक्तीसाठी दरवर्षी प्राधिकृत वैद्यकिय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहिल. ( सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय दि. १७/०८/१९९९.)

१८) कुटुंबाची व्याख्या शासन निर्णय दिनांक १८ ऑगस्ट १९९४ मध्ये देण्यात आलेली आहे.

१९) औषधोपचारवरील खर्चाच्या प्रतिपुर्तीची अनुज्ञेयता प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% रक्कम सरसकट अनुज्ञेय राहिल. (सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय दि.१९ मार्च २००५.)

२०) खाजगी रुग्णालयातील वास्तव्याची प्रतिपुर्ती पुढीलप्रमाणे राहील. (सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय दि.१९ मार्च २००५)

| अ.क्र. | खाजगी रुग्णालयातील वास्तव्याचा प्रकार. | प्रतिपुर्ती दर |
|---|---|---|
| १ | जनरल वार्ड (सर्वसामान्य कक्ष) | ९५% |
| २ | जनरल वार्डच्या बाजुचा बाथरुम नसलेला कक्ष | ९०% |
| ३ | बाथरुमसह स्वतंत्र कक्ष | ७५% |
| ४ | बाथरुमसह डबल बेडेड कक्ष | ७५% |
| ५ | बाथरुमसह वातानुकुलित कक्ष | ७५% |
| ६ | अतिदक्षता कक्ष | १००% |

२१) खाजगी रुग्णालयात उपचार घेतले असल्यास ज्या वार्डामध्ये रुग्णास अंतररुग्ण कालावधीत ठेवले होते त्याच्या समकक्ष प्रकाराबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे. (ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दि. ३१/०७/२००६)

www.lekhamitra.blogspot.com

२२) शासकिय कर्मचा-याने शासकिय रुग्णालयात बाहयरुग्ण म्हणुन उपचाराबाबत प्रमाणपत्र अ तर अंतररुग्ण म्हणुन उपचाराबाबत प्रमाणपत्र ब भरुन देणे आवश्यक आहे. (सार्वजनिक आरोग्य विभाग परिपत्रक दि.३१/०८/१९८७)

२३) खाजगी रुग्णालयात तातडीच्या प्रसंगी उपचार करणा-या डॉक्टरचे प्रमाणपत्र नमुना क भरुन सहीखाली रुग्णालयाचे नाव, डॉक्टरचे नाव,रजिस्ट्रेशन क्रमांक आणि सोबत नमुन ड जोडुन त्यामध्ये खर्चाचा संपुर्ण तपशील जोडणे आवश्यक आहे. ( महाराष्ट्र वैद्यकिय देयक नियम १९६१ मधील १६(१) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय ३०/०८/१९९९.)

२४) विशेष तातडीच्या २७ आजाराच्या बाबतीत खाजगी रुग्णालयात अंतररुग्ण म्हणुन कर्मचारी किंवा त्याच्या कुटुंबातील व्यक्तीने घेतलेले उपचार वैद्यकिय प्रतिपुर्तीस पात्र राहतील. (सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय दि.१९ मार्च २००५)

२५) रुग्ण सरकारी कर्मचाऱ्यावर अवलंबीत असल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. सरकारी कर्मचाऱ्यावर अवलंबुन असलेल्या निवृत्तीवेतनधारकाचे मुळ निवृत्तीवेतन रु.९०००/- पेक्षा अधिक नसावे.(वैद्यकिय देयक नियम १९६१. नियम २(३) व शासन निर्णय दिनांक ०२ ऑगस्ट २०१९.)

२६) संबंधित कर्मचारी /अधिकारी यांचे कुटुंब मर्यादित असल्याबाबतचे प्रमाणपत्र अहरण व संवितरण अधिका-याने सही करुन देणे आवश्यक आहे. (वैद्यकिय देयक नियम १९६१ नियम १४)

२७) महिला शासकिय कर्मचाऱ्यासोबत राहत असलेल्या व तिच्यावर पुर्णपणे अवलंबुन असलेल्या सासु सासरे किंवा आई वडील यापैकी सवलतीसाठी एकाची निवड केल्याबाबत विकल्प सेवापुस्तिकेत नमुद केले आहे असे प्रमाणपत्र जोडले आहे.{वैद्यकिय देखाभाल नियम २(३)}

२८) राज्य शासन, रेल्वे, संरक्षण, शासनाच्या मालकीच्या संघटना, अगर खाजगी संघटनांमध्ये कामाकरिता असणाऱ्या कर्मचारी /अधिकारी यांचे पती/पत्नी यांनाजर वैद्यकीय भत्ता मिळत असेल तर त्यांना महाराष्ट्र राज्य वैद्यकिय देयक नियम १९६१ अन्वये सवलतीचा लाभ घेण्याचे किंवा संघटनेने /संस्थेने ठरविलेल्या सवलतीचा लाभ यापैकी कोणताही एक पर्याय निवडल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. (सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय दि.१८.०८.१९९९)

२९) रोखपावत्यांवर , प्रमाणपत्रावर तारीख /रक्कमेत फेरबदल केलेला असल्यास संबंधीतांनी पुर्ण स्वाक्षरीने साक्षांकन करावे. (महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ क्र.१५३ (५))

३०) शस्त्रक्रियेसाठी वापरण्यात आलेली उपकरणे पुन्हा वापरात आणली नाहीत अथवा वापरात आणता येणार नसल्याचे प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र देयकासोबत जोडावे. (सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय दि.१६.०८.१९९९)

Join telegram channel @lekhamitra

www.lekhamitra.blogspot.com

३१) देयकासोबत मागणी करण्यात आलेली परदेशी बनावटीच्या इंन्ट्रा ॲक्युलर लेन्सच्या खर्चाची प्रतिपुर्तीची मागणी देय नाही. परंतु भारतील बनावटीच्या इंन्ट्रा ॲक्युलर लेन्सच्या खर्चाची प्रतिपुर्तीच्या मर्यादेत मागणी देय आहे. (सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय दि.१६.०८.१९९९ चे परिशिष्ट-अ)

३२) नर्सिंग चार्जेस आवश्यक असल्याचे सक्षम वैद्यकीय प्राधिकाऱ्यांकडुन प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. (वैद्यकिय देयक नियम १९६१. नियम २ (७) (ई)}

३३) पाच कि.मी.पेक्षा अधिक अंतरासाठी रुग्णवाहीका सेवा घेतली असल्यामुळे तसे आवश्यक असल्याचे सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यांकडुन प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. (वैद्यकिय देयक नियम १९६१. नियम २ (७) (जे)}

३४) रुग्णाच्या निवासस्थानी उपचार केले असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याच्या मते वैद्यकीय देखभाल नियम ८ (२) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे उपचार करता येत नसल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. (वैद्यकिय देयक नियम १९६१. नियम ९ (१) }

३५) उपचारात आहारावरील खर्चाचा समावेश करु नये (वैद्यकिय देयक नियम १९६१. नियम ९ (२)}

३६) जे पदार्थ ऑाषधे नसुन प्रामुख्याने अन्नाच्या स्वरुपाची, शक्तीवर्धक किंवा प्रसाधनविषयक आहेत त्यांचा प्रतिपुर्ती देयकात समावेश करु नये. (वैद्यकिय देयक नियम १९६१. नियम १०)

३७) नगर परिषद कर्मचारी अधिकारी बाबतीत कोणत्या परिस्थितीत वैद्यकीय प्रतिपुर्ती द्यावी याबाबत संबंधित नगरपरिषदेने निर्णयघ्यावा.(नगर परिषद प्रशासन संचालनालय पत्र दि. 08/02/2005)

३८) रु.5000/- रक्कमेच्या पुढील पावत्यांवर रेव्हेन्यु स्टँप डकवावा.भारतीयस्टँपकायदा 1899 कलम 2(23)

३९) वैद्यकीय प्रतिपुर्तीच्या रक्कमेचा आयकर गणनेसाठी समावेश करणे आवश्यक आहे. (आयकर अधिनियम)

| वैद्यकीय प्रतिपुर्ती या विषयाशी संबंधीत महत्वाचे नियम, शासन निर्णय पुढीलप्रमाणे आहेत | | |
|---|---|---|
| अ क्र | वर्ष महिना दिनांक | तपशिल |
| १ | १९६१ | महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ |

Join telegram channel @lekhamitra

| | | |
|---|---|---|
| २ | १९७१ | महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वैद्यकीय सेवा) नियम १९७१ |
| ३ | १९७१०९०४ | महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वैद्यकीय सेवा) नियम १९७१ सुधारणा |
| ४ | १९७२०४१५ | महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वैद्यकीय सेवा) नियम १९७२ सुधारणा |
| ५ | १९७४०८१७ | महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वैद्यकीय सेवा) नियम १९७४ सुधारणा |
| ६ | १९७५०९१५ | महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वैद्यकीय सेवा) नियम १९७५ सुधारणा |
| ७ | १९७६०२०६ | महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वैद्यकीय सेवा) नियम १९७६ सुधारणा |
| ८ | १९७६११०४ | महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वैद्यकीय सेवा) नियम १९७६ सुधारणा |
| ९ | १९८५०८२१ | शासकीय कर्मचा-यांना वैद्यकीय सुविधा अग्रिम व नियम |
| १० | १९८६०६११ | जिल्हा परीषद कर्मचा-यांना वैद्यकीय सुविधा अग्रिम व नियम |
| ११ | १९८७०७३० | देयके मंजूर करण्याचे अधिकार जिल्हा शल्य चिकित्सक यांना देणेबाबत |
| १२ | १९८९०५२९ | अन्नपदार्थ, टॉनिक, जंतुनाशके, इ. नादेय बाबी |
| १३ | १९८९०६२८ | संदर्भ पत्र |
| १४ | १९९१०५३१ | प्रसुति पुर्व नोंदणी प्रमाणपत्र |
| १५ | १९९१०६०७ | विहित कालावधी व विलंब कालावधी |
| १६ | १९९३११०६ | शासकीय रुग्णालये उपचार प्रतिपूर्ती अमर्याद |
| १७ | १९९४०८१६ | प्रतिपूर्ती अधिकार गट विकास अधिकारी यांना नसणेबाबत |
| १८ | १९९७०७०१ | स्वतंत्र कालावधीसाठी स्वतंत्र संचिका |
| १९ | १९९८०९०३ | शक्तिवर्धक औषधे, रक्त, बाह्यरुग्ण अनुज्ञेय नसणेबाबत |
| २० | १९९९०२२५ | शासन विनिर्दिष्ट २३ आकस्मिकता असलेल्या आजारातील आजार प्रमाणित करण्याचे अधिकार प्रदान करण्याबाबत |
| २१ | १९९९०३०१ | शासकीय रूग्णलायात अनुज्ञेय असलेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती करण्याची सध्याची कार्यपध्दती कायमस्वरूपी पुढे चालू ठेवण्याबाबत. |
| २२ | १९९९०३०५ | मुख्य कार्यकारी अधिकारी विभाग प्रमुख |
| २३ | १९९९०६२८ | खाजगी रुग्णालय नोंदणी क्रमांक नमुद करणे शिथिल |
| २४ | १९९९०७२९ | खोली प्रकार मुळ |
| २५ | १९९९०८१६ | कुत्रीम यंत्राची खरेदी दुरूस्ती इत्यादीवरील खर्चाची प्रतिपूर्ती एकत्रित आदेश |
| २६ | १९९९०८१७ | मधुमेह |
| २७ | १९९९०८१८ | वैद्यकीय प्रतिपूर्ती कुटुंब व्याख्या |
| २८ | १९९९०८२१ | परदेशात घेतलेल्या वैद्यकीय उपचारावर आणि भारतामध्ये विशेषतज्ञांकडून |
| २९ | १९९९०८२१ | प्रसुतीसाठी झालेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्याबाबत |
| ३० | २००००७०४ | अग्रिम ७५०००/- एवजी १०००००/- |
| ३१ | २००१०११२ | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रादेशिक विभाग प्रमुख |
| ३२ | २००५०२०८ | नगर परिषद कर्मचारी अनुज्ञेयता |
| ३३ | २००५०३१९ | खाजगी रुग्णालयातील आंतररुग्ण उपचाराच्या वैद्यकीय खर्चाच्या मंजूरीबाबत दर सुधारणा |

www.lekhamitra.blogspot.com

Join telegram channel @lekhamitra

| | | |
|---|---|---|
| ३४ | २००६०२१० | अग्रीमाचा मर्यादा रू. १०००००/- वरून रू. १५००००/- पर्यंत वाढविल्याबाबत. |
| ३५ | २००६०७१३ | डायलिसीस मूत्रपिंड |
| ३६ | २००६०७३१ | वैद्यकीय दक्षता |
| ३७ | २००७०७२३ | संदर्भ पत्र वैद्यकीय |
| ३८ | २००८०७०४ | वैद्यकीय प्रतिपुर्ती विलंब |
| ३९ | २००९०८०४ | अशासकीय अनुदानीत अपंग विशेष शाळा वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती |
| ४० | २०१०१२०६ | सक्षम अधिकारी प्रमाणपत्र कालावधी |
| ४१ | २०१११११९ | अवलंबित्व ठरविण्यासाठी उत्पन्नावरील मर्यादा सुधारण्याबाबत रू. ३५००/- |
| ४२ | २०१११११६ | प्रतिपूर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजूरीच्या अधिकारांबाबत सुधारणा १००००० |
| ४३ | २०१३१०११ | वैद्यकिय प्रतीपुर्ती करीता खाजगी रुग्णालयाची यादी |
| ४४ | २०१४०४११ | वैद्यकिय अधिकारी बेठक दर मंगळवारी |
| ४५ | २०१४०९२५ | प्रसुतीशास्त्र व स्त्रीरोग संबंधातील आकस्मिक आजाराच्या बाबतीत वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करण्याबाबत |
| ४६ | २०१५०८२४ | प्रतिपुर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजूरीच्या अधिकारांत सुधारणा करण्याबाबत |
| ४७ | २०१६०२१५ | दर व परिगणना एंजियोप्लास्टी व बायपास |
| ४८ | २०१६०२२४ | जिल्हा शल्य चिकित्सक प्रमाणपत्राबाबत आवश्यकता आहे |
| ४९ | २०१६०३१६ | कमाल मर्यादा व मंजूरीच्या अधिकारात सुधारणा करणेबाबत ३०००००/- |
| ५० | २०१६०९२८ | कर्करोग शासनमान्य खाजगी रुग्णालय वगळून इतर खाजगी रुग्णालयात प्रतिपूर्तीच्या मंजूरी बाबत |
| ५१ | २०१९०५२२ | नादेय बाबी |
| ५२ | २०१९०६०६ | रु. २०००००/- पर्यंत चे अधिकार प्रादेशिक विभाग प्रमुख यांना देणे बाबत |
| ५३ | २०१९०८०२ | वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या प्रयोजनार्थ अवलंबित्व ठरविण्यासाठी उत्पन्नावरील मर्यादा सुधारण्याबाबत रू.९०००/- |
| ५४ | २०२०१२१७ | आकस्मिक आजारांमध्ये कोविड-१९ या नवीन आजाराचा समावेश करणेबाबत.. |

-गोविंद लतिका अच्युतराव बोंदर
लेखाधिकारी,
जिल्हा परिषद उस्मानाबाद.

www.lekhamitra.blogspot.com

Join telegram channel @lekhamitra